**सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाचे सरळसेवेसाठी असणारे भरतीचे प्रमाण १००% बदलून ५०% सरळसेवेसाठी आणि ५०% पदोन्नतीसाठी करणेबाबत..**

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी, जि.अहिल्यानगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-२ (२२५)/११५/२०२५ दिनांक- १५/०४/२०२५

**वाचा:-** जा.क्र.प्राधि-१/कार्यकारी परिषद ३४२ वी बैठक/का.अ./९६/२०२५, दिनांक ०४/०३/२०२५

**पार्श्वभुमी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील ०१ पद कायम आस्थापनेवर मंजूर आहे. सदरचे पद १००% सरळसेवेने भरण्यात येत होते. यापुर्वी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) हे पद सरळसेवा नियुक्तीने भरण्यात आले होते. परंतु सदर पद दिनांक ३१/०५/२०२३ रोजी रिक्त झालेले असून तेव्हापासून रिक्त आहे.

**विद्यापीठ निर्णय:**

**" सहाय्यक अभियंता (स्थापत्य)" हे पद एकाकी असल्यामुळे आळीपाळीने एकदा सरळसेवा व एकदा कनिष्ठ अभियंता या निम्न संवर्गातून पदोन्नतीसाठी उपलब्ध करुन देणेकरीता सहाय्यक अभियंता (स्थापत्य) पदाचे सरळसेवेसाठी असणारे भरतीचे प्रमाण १००% बदलून ५०% सरळसेवेसाठी आणि ५०% पदोन्नतीसाठी करण्याकरिता सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा. कार्यकारी परिषद ३४२ व्या बैठकीत ठराव क्र.३६/का.प.बै.३४२(०७.०१.२०२५) अन्वये शिफारस केलेनुसार व महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम,१९९० मधील कलम ८८ (२) आणि (३) अन्वये मा. कुलगुरु महोदयांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सहाय्यक अभियंता (स्थापत्य) पदाचे भरती प्रमाण सुधारणेस मान्यता देणेत येत आहे.**

*स्वाक्षरीत/-*
कुलसचिव

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -

१. मा. संचालक, संशोधन/ विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
४. विभाग प्रमुख (सर्व)
५. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)
७. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व).
८. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकरी, मफुकृवि, राहुरी.
९. उपकुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), मफुकृवि, राहुरी
१०. अधिदान व लेखाधिकारी/ सहाय्यक नियंत्रक/सहाय्यक कुलसचिव (सर्व)
११. मा.कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी

प्रत माहितीस्तव- मा.सहासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर पुणे -४

(विजय त्र्यं. पाटील)
उपकुलसचिव (प्रशासन)